**प्रथम दर्शनी पिक प्रात्यक्षिक अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तळणी येथील सेंद्रिय परसबाग पाहणी**

जि.प.प्रा.शा. तळणी शाळेमध्ये राबवण्यात येत असलेला "मुख्यमंत्री -माझी सुंदर शाळा" या उपक्रमांतर्गत सेंद्रिय परसबाग कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णीच्या, मार्गदर्शनाखाली आद्यरेषिय प्रात्यक्षिक (FLD) च्या माध्यमातून तयार करण्यात आली आहे. या सेंद्रियपरसबागेचे follow up(पाहणी) व मार्गदर्शन कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णीचे डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख ), प्रा.सौं अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ) व डॉ.अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) यांच्याद्वारे करण्यात आले. यावेळी जि.प.प्रा.शा. तळणीचे मुख्याध्यापक श्री. गोविंद घोडके, व शिक्षक/शिक्षिका श्री. ढवळे, सौं. जोड, श्री. बडुरे, सौं. साखरे, कु. ढगे सौं. मोरलवार व मदतनीस अनुसया सूर्यवंशी हे उपस्थित होते. शाळेतील परसबागेतील सर्व भाजीपाला शाळा पोषण आहारामध्ये उपयोग केला जातो, तसेच कार्यानुभव या विषयामध्ये श्रमदानामुळे विद्यार्थ्यामध्ये ज्ञानाचे धडे देखील दिले जातात. कृ.वि.के च्या माध्यमातुन वेळोवेळी मार्गदर्शन,भाजीपाला बियाणे, जैविक निविष्ठा यांचा वेळोवेळी पुरवठा केला जातो. वापरल्या जाणाऱ्या जैविक निविष्ठांची माहिती, किटक व रोग नाशक औषधी याबद्दल वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषि विस्तार तज्ञ आणि गृह विज्ञान तज्ञ यांनी पुर्णपणे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना सहलीच्या माध्यमातुन कृषि विज्ञान केंद्राला भेट देऊन विविध उपक्रमांचा आढावा घ्यावा जेणे करून विद्यार्थ्यांना कृ.वि.कें ची ओळख, कार्य, उदिष्ट, नैसर्गिक व जैविक शेती याबद्दल सखोल माहिती होईल असे आवाहन कृ.वि.कें चे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) देविकांत देशमुख यांनी केले. सर्व मुख्याध्यापक शिक्षक - शिक्षिका, मदत निस सर्वांनी चांगली मेहनत घेऊन परसबाग फुलवली त्याबददल त्यांचे के.वि.के.पोखर्णी कढून आभार मान्यात आले. यावेळी के.वि.के.चे कर्मचारी श्री. सुदाम गायकवाड आणि संतोष वाघमारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




Dr Kshatriya A M

